**महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा परीक्षा-२०१७ मधून नियुक्त झालेल्या सहायक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य), गट-अ यांचा परिवीक्षा कालावधी समाप्त करणेबाबत.....**

# महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक :- परिवी-२०२४/प्र.क्र.०९/आ(संनि),

तिसरा मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक :- २१ जानेवारी २०२५**

**वाचा** - १) शा.नि.क्र.नियुक्ती-२०१९/प्र.क्र.६५/आ(संनि) , दिनांक २६.१२.२०१९

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परिवि-२७१५/प्र.क्र.२०३/आठ, दिनांक २५.०८.२०१५

## शासन निर्णय

संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णय दि.२६.१२.२०१९ अन्वये महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा गट-अ मध्ये खालील नमूद उमेदवाराची सहायक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य) (गट-अ) या पदावर दोन वर्षांकरीता परिवीक्षाधीन उमेदवार म्हणून नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात आलेली आहे.

२. खाली नमूद सहायक अभियंता श्रेणी-१ ( स्थापत्य ) (गट-अ) यांनी परिवीक्षा कालावधी पूर्ण करण्यासाठी आवश्यक अटी व शर्ती समाधानकारकरित्या पूर्ण केल्या आहेत. संबंधितांविरुध्द शासन स्तरावर विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही. यास्तव, संबंधितांचा परिवीक्षा कालावधी त्यांच्या नावासमोर रकाना क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या दिनांकास समाप्त करण्यात येऊन संबंधितांची सहायक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य), गट-अ या पदावरील सेवा पुढे सुरू ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | सहायक अभियंता श्रेणी -१ (स्थापत्य) यांचे नाव | शासन सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | व्यावसायिक परीक्षेचा कालावधी | घेतलेली रजा ( एकूण दिवस ) | परिवीक्षा कालावधी संपल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | श्री.सिध्दांत मनोहर वाहने | दि.०१.०१.२०२० | ०३.०९.२०२१ ते ०४.०९.२०२१ | निरंक | दि.०१.०१.२०२२ (म.पू.) |

Scanned with ACE Scanner

३.	सदर शासन निर्णय संदर्भांकित क्र.२ येथील शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक परिवि-२७१५/प्र.क्र.२०३/आठ, दि.२५.०८.२०१५ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( बापूसाहेब रा. सोनवणे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१) महालेखापाल-१/२, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर.

२) अधीक्षक अभियंता व सहसंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक.

३) मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर.

४) श्री.सिध्दांत मनोहर वाहने, सहायक अभियंता श्रेणी-१
व्दारा : गोसीखुर्द प्रकल्प जलसंपदा विभाग नागपूर.

५) कार्यासन आ (वर्ग-१)/आ (वर्ग-२)/गोपनीय कार्यासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

६) आ (संनि), कार्यासन संग्रहार्थ.

Scanned with ACE Scanner